डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२० – २५६९७३४१
०२०–२५६२२६८८/८९
मोबाईल : ९८८१९०८०२०
०२०–२५६२२६९२

**रासेया/२०२०–२१/९** **अत्यंत महत्त्वाचे आणि तातडीचे** **दि. ०८/०७/२०२०**

**प्रति,**

**मा. प्राचार्य व**

**रासेयो कार्यक्रम अधिकारी**

**रासेयो संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्था,**

**पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा**

**विषय : प्रेरणा–राज्यस्तरीय नेतृत्व गुणविकास ऑनलाईन शिबिरात सहभागी होणे बाबत..**

महोदय/महोदया,

मा. राज्यसंपर्क अधिकारी, रासेयो कक्ष, मंत्रालय कक्ष, मुंबई यांनी पाठवलेल्या पत्रानुसार **उच्च व तंत्र शिक्षण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने 'प्रेरणा' राज्यस्तरीय नेतृत्व गुणविकास शिबिराचे, ऑनलाईन पद्धतीने** आयोजन **शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** येथे **दि. ११ ते १५ जुलै २०२०** दरम्यान करण्यात आलेले आहे. याशिबिराकरिता महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांमधून १५० स्वयंसेवक व १० कार्यक्रम अधिकारी–संघनायक सहभागी होणार आहेत.

डॉ. अतुल साळुंखे, राज्यसंपर्क अधिकारी, रासेयो, महाराष्ट्र शासन यांनी सदर शिबिरामध्ये महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमधील रासेयो स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी यांचा सहभाग अनिवार्य केला आहे. सदर सहभागींना त्यांचे सहभागीचे प्रमाण लक्षात घेऊन खालीलप्रमाणे विशेष प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

१. विद्यापीठनिहाय ७५% पेक्षा जास्त स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविल्या सदर विद्यापीठाचा विशेष सहभागी म्हणून प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल.
२. सर्वाधिक सहभागी नोंद झालेल्या एका जिल्ह्याचा व जिल्हा समन्वयकांचा विशेष प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.
३. प्रत्येक जिल्ह्यातील एका महाविद्यालयास ज्या महाविद्यालयांनी त्या जिल्ह्यात सर्वाधिक सहभाग नोंदवला असेल तर त्यांना विशेष प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

तरी आपल्या महाविद्यालयातील जास्तीतजास्त विद्यार्थी ऑनलाईन पद्धतीने सहभागी व्हावे यासाठी आपण आवश्यक त्या सूचना रासेयो स्वयंसेवकांना व कार्यक्रम अधिकाऱ्यांना देण्यात याव्यात.

सहभागी स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकाऱ्यांना ऑनलाईन सहभागी होण्याकरिता ओरीयन्टेशनचे ६ तास देण्यात येतील. तसेच ऑनलाईन सहभागी होण्याकरिता इंटरनेटसह अँड्राइड मोबाईल, लॅपटॉप, संगणक यापैकी असणे बंधनकारक आहे. शिबिरामध्ये ऑनलाईन प्रक्रियेद्वारे सहभागी होण्याबाबतच्या पुढील सूचना लवकरच रासेयो ग्रुपवर अथवा परिपत्रकाद्वारे कळवण्यात येईल. कळावे, ही विनंती.

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**